ePaper
वर्ष - 8 । अंक - 273 | UDYAM-MH-26-0158827

**महाराष्ट्रावर अतिमुसळधार पावसासह आणखी एक नवं संकट**



# महाईन्यूज™

### आतील पानांत

- पंजाबचा लखनौवर दणदणीत विजय!
- विराटने माझ्या लेकाला सावरलं
- ऑपरेशन ब्लू स्टार ही काँग्रेसची चूक!
- देशाला जे वाटतं आहे ते होणारच


www.mahaenews.com | सोमवार, दि. 5 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## नरेंद्र मोदींच्या उच्चस्तरीय बैठका सुरूच

# अवघ्या काही सेकंदावर रावळपिंडी, इस्लामाबाद!

**पाकव्याप्त काश्मीर आणि बलुचिस्तानमधील नागरिक मोठ्या बंडाच्या तयारीत..**

। नवी दिल्ली / श्रीनगर / इस्लामाबाद ।
प्रतिनिधी । महाईन्यूज

**पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदींनी उच्चस्तरीय बैठकांचे आयोजन केले होते. शनिवारी त्यांना नौदलप्रमुख भेटून सविस्तर चर्चा करून गेले तर रविवारी हवाईदल प्रमुखांचीही प्रदीर्घ चर्चा झाली. या व्यतिरिक्त परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर, संरक्षणमंत्री राजनाथसिंग आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल हे देखील नरेंद्र मोदी यांच्याशी सतत संपर्कात आहेत.**







### क्षेपणास्त्रांच्या चाचण्या सुरूच..

भारताची लढाऊ नौका 'आयएनएस विक्रांत' अरबी समुद्रात पाकिस्तानच्या सीमेजवळ जाऊन उभी असून त्यावरून क्षेपणास्त्रांच्या यशस्वी चाचण्याही होत आहेत. फक्त आदेश येण्याची वाट आहे आणि काही सेकंदात रावळपिंडी तसेच इस्लामाबाद बेचिराख होऊ शकतात, अशी शक्यता भारताचे संरक्षणतज्ज्ञ व्यक्त करीत आहेत.

### पाकसरकारविरुद्ध असंतोष..

भारताविरुद्ध शत्रुत्व स्वीकारल्याने पाकिस्तानच्या काही भागात तेथील सरकारविरुद्ध प्रचंड असंतोष आहे. त्यात प्रामुख्याने पाकव्याप्त काश्मीरमध्ये तर निदर्शने होत असून मोदी सरकारचा जयघोष होत आहे. आम्हाला पाकिस्तानच्या तावडीतून सोडवा, अशा आशियाचे फलक पाकव्याप्त काश्मीरमध्ये फडकत आहेत.

### बलोच नागरिकही बंडाच्या पवित्र्यात..

पाकिस्तानचा सतत अन्याय सहन करणारे बलुचिस्तानचे नागरिक आता मोठ्या बंडाच्या तयारीत आहेत. त्यांनी तर आपला देश स्वतंत्र झाल्याचे जाहीर केले असून देशाचा स्वतंत्र झेंडा आणि समांतर सरकारही स्थापन केले आहे. भारताला हीच संधी आहे आणि पाकिस्तानचा हा मोठा भाग त्यांच्यापासून वेगळा करावा, अशी तेथील नागरिकांची मोठी अपेक्षा आहे.

### भारताचा आणखी वॉटर स्ट्राईक..

दरम्यान, दहशतवादी हल्ल्याच्या दिवशीच भारताने पाकिस्तान सोबतचा सिंधू पाणीकरार रद्द केल्यानंतर आता चिनाब नदीवर बांधलेल्या बागलीहार धरणाचे पाणीही थांबवले आहे. या निर्णयामुळे पाकिस्तानच्या तोंडचे पाणी मात्र पळाले आहे. 'पीटीआय' ने दिलेल्या वृत्तानुसार जम्मूतील रामबन येथे बांधलेल्या या बागलीहार धरणाने चिनाब नदीचे पाणी थांबवले आहे. त्याचवेळी आता काश्मीरमधील किशनगंगा धरणातून झेलम नदीचे पाणीही रोखण्याची योजना आहे. येत्या एक-दोन दिवसात तोही 'वॉटर स्ट्राईक' होणार आहे.

### एस. जयशंकर यांनी सुनावले..

दहशतवादी हल्ल्यानंतर युरोपियन युनियनकडून आलेल्या प्रतिक्रियेवर परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी कडवी नाराजी व्यक्त केली आहे. भारताला जागतिक मंचावर अशा देशांची गरज आहे, जे भारताच्या न्याय्य बाजूने उभे राहतील. उपदेश करणाऱ्या देशांची मुळीच गरज नाही, असे ते म्हणाले.

## भ्याड हल्ला करणारे चारही दहशतवादी अजूनही काश्मीरच्या जंगलातच..

काश्मीर खोऱ्यातील पहेलगाम येथे हिंदूंवर झालेल्या भ्याड हल्ल्यात पळून गेलेले चारही दहशतवादी काश्मीरच्या जंगलातच लपून बसले आहेत, कदाचित तेथील काही स्थानिक नागरिकांचा त्यांना पाठिंबा असावा असे मत या प्रकरणाची चौकशी करणाऱ्या 'एन आय ए' च्या प्रमुखांनी व्यक्त केले आहे. लवकरच त्यांना आम्ही ताब्यात घेऊ, असेही ते म्हणाले.

### ... तेच होणार : राजनाथ

संपूर्ण देशाच्या मनात जे आहे, तेच लवकर होणार आहे, असे उद्गार संरक्षणमंत्री राजनाथसिंग यांनी काढले आहेत. दहशतवादी हल्ल्याचा फार मोठ्या प्रमाणावर प्रतिकार होणार असून थोडी वाट पाहा. पण, तांडव होणार हे निश्चित आहे. हिंदूंकडे डोळे वर करून पाहणाऱ्यांचे डोळे तर काढूच, पण त्यांना सडेतोड उत्तर देऊ आणि देशाच्या चारही सीमा सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी माझी आहे, असे ते म्हणाले.

ePaper

# महाराष्ट्रावर अतिमुसळधार पावसासह आणखी एक नवं संकट

| वर्ष - 8 | अंक - 273 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज™

**आतील पानांत**


- पंजाबचा लखनौवर दणदणीत विजय!
- विराटने माझ्या लेकाला सावरलं
- ऑपरेशन ब्लू स्टार ही काँग्रेसची चूक!
- देशाला जे वाटतं आहे ते होणारच


www.mahaenews.com | सोमवार, दि. 5 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## मनसे-ठाकरे गटाच्या युतीच्या चर्चेला चांगलीच हवा

# मनसे-ठाकरे गटाची युती होणार?

## शिवसेनेतील बडे नेते विनायक राऊत यांचे विधान चर्चेत

**। मुंबई / पुणे / बीड । प्रतिनिधी । महाईन्यूज**

**मुंबई : गेल्या अनेक दिवसांपासून मनसेचे आणि ठाकरे गट यांच्या युतीची चर्चा चालू आहे. मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी जाहीरपणे केलेल्या विधानांनंतर या युतीच्या चर्चेला चांगलीच हवा मिळाली. दरम्यान, दोन्ही बाजूच्या नेत्यांनी नंतर वेगवेगळ्या प्रतिक्रिया दिल्या. असे असतानाच ठाकरे यांच्या शिवसेनेतील बडे नेते विनायक राऊत यांनी याच ठाकरे बंधूंच्या एकत्रिकरणावर मोठी आणि महत्त्वाची प्रतिक्रिया दिली. ते पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं देत होते.**



महाराष्ट्र नवनिर्माण सेना

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे

### विनायक राऊत नेमकं काय म्हणाले?

"राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे परदेशात गेले हा योगायोग आहे. दोन दिवसांपूर्वी राज ठाकरे हे मुंबईत परत आले आहे. महाराष्ट्रातील सर्वच जनतेची एक इच्छा आहे. सध्याची वाईट राजवट, महाराष्ट्र लुबाडू पाहणाऱ्यांची राजवट उलथवून टाकायची असेल तर ठाकरे बंधुंनी एकत्र यावं, अशी जनतेची इच्छा आहे. हे नाकारता येत नाही, असं विधान ठाकरे गटाचे नेते विनायक राऊत यांनी केले.गेल्या काही दिवसांपासून मनसेप्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे एकत्र येणार असल्याची चर्चा सुरू आहे. महाराष्ट्राच्या अस्तिवापुढे आमचे वाद, भांडणं या शुल्लक गोष्टी असल्याचं राज ठाकरे यांनी म्हटलं होतं. तर उद्धव ठाकरे यांनी देखील राज ठाकरे यांच्या भूमिकेला सकारात्मक प्रतिसाद दिला होता, यावर देखील यावेळी विनायक राऊत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ठाकरे बंधू एकत्र यावेत ही महाराष्ट्राच्या जनतेची इच्छा असल्याचं राऊत यांनी म्हटलं आहे.

### अजित पवार यांना खुली ऑफर



विनायक राऊत यांनी यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनादेखील महाविकास आघाडीत येण्याची खुली ऑफर दिली. काही दिवसांपूर्वी अजित पवार यांनी मुख्यमंत्री व्हायचं आहे. पण अद्याप योग आला नाही, असं विधान केलं होतं. त्यानंतर राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटल्या. हाच धागा पकडून विनायक राऊत यांनी अजित पवार जोपर्यंत महायुतीत आहेत, तोपर्यंत ते मुख्यमंत्री होणार नाहीत. त्यामुळे मुख्यमंत्री होण्यासाठी त्यांनी महाविकास आघाडीत यावं, अशी खुली ऑफरच विनायक राऊत यांनी दिली आहे.

### अद्याप कोणत्याही हालचाली नाही

दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून ठाकरे बंधूंच्या युतीची चर्चा सगळीकडे रंगली आहे. दोन्ही ठाकरेंनी एकत्र येण्याबाबत अनुकूलता दाखवली आहे. त्यानंतर मात्र अद्याप कोणत्याही हालचाली झालेल्या नाहीत. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे आपापल्या परदेश दौऱ्याहून परतले आहेत. त्यामुळे आता पडद्यामागे नेमक्या काही घडामोडी घडणार का? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

### संजय राऊत काय म्हणाले?

मनसे आणि शिवसेना ठाकरे गटाच्या युतीबाबत जर राज ठाकरे यांनी पुन्हा सकारात्मक भूमिका घेतली तर शिवसेना ठाकरे गट महाविकास आघाडीतून बाहेर पडणार का? असा प्रश्न माध्यमांच्या प्रतिनिधींनी संजय राऊत यांना विचारला. यावर ते म्हणाले की, "आता हा तुमचा प्रश्न पुढचा आहे. या प्रश्नावर मी आत्ता उत्तर देणार नाही. महाविकास आघाडी ही आमची राजकीय व्यवस्था आम्ही महाराष्ट्रासाठी केलेली आहे. राज ठाकरे हे सध्याच्या परिस्थितीत भाजपा किंवा शिंदे गट यांच्याबरोबर आम्हाला दिसत आहेत. त्यामुळे आमच्या दृष्टीने ते महाराष्ट्राच्या हिताचं काम करत नाहीत. राज ठाकरे यांचा वापर करून भाजपा महाराष्ट्रात मराठी माणसांना त्रास देण्याचं कारस्थान पडद्यामागून करत आहे. हे राज ठाकरे यांच्या लक्षात आलं असेल तर हे मराठी माणसांवर उपकार होतील", असं संजय राऊत यांनी म्हटलं आहे. "भारतीय जनता पक्षाला ठाकरे हे नाव नष्ट करायचं आहे. अशावेळी जर दोन्ही ठाकरेंनी साद आणि प्रतिसाद ही भूमिका घेतली असेल तर महाराष्ट्र स्वागत करेल. आम्ही आता उद्धव ठाकरे यांनी भूमिका मांडल्यानंतर प्रतिक्षा करणार आहोत. आम्ही नक्कीच सकारात्मक भूमिकेतून या सगळ्या गोष्टींकडे पाहत आहोत. शेवटी महाराष्ट्राच्या कल्याणाचा विषय आहे", अशी भूमिका संजय राऊत यांनी मांडली आहे.

# ढोल-ताशाला खेळ म्हणून मान्यता मिळावी!

## उद्घाटनात ढोल-ताशांचे वादन व्हावे : चंद्रकांत पाटील

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील एक हजार मंडळांमधील एकही ढोल-ताशा वादक बेरोजगार राहणार नाही, म्हणून विविध योजनांच्या माध्यमातून प्रयत्न करणार असल्याची ग्वाही उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी रविवारी दिली. 'पथकातल्या तरुणांना आर्थिक अडचण निर्माण होऊ नये म्हणून ढोल-ताशा पथकांनीही प्रयत्न करायला हवेत,' अशी अपेक्षा पाटील यांनी या वेळी व्यक्त केली.**




'ढोल-ताशा पथकांच्या पहिल्या राज्यस्तरीय अधिवेशना'चे उद्घाटन चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे विश्वस्त राजेश पांडे, ॲड. प्रताप परदेशी, ढोल-ताशा महासंघाचे अध्यक्ष पराग ठाकूर, बीएमसीसीचे प्राचार्य डॉ. राजेश सुपेकर या वेळी उपस्थित होते.पाटील म्हणाले, 'वाद्यांच्या वादनाने माणसाला आत्मिक समाधान प्राप्त होते. राज्यातील वाद्यांची परंपरा मोठी आहे. ती काळासोबत विकसित होत गेली. वेगवेगळ्या वाद्यांचा समावेश विविध प्रकारच्या वादनांमध्ये होत गेला. आता ढोल-ताशा पथकांनीही वेगवेगळ्या वाद्यप्रकारांचा समावेश पथकांमध्ये करावा.'बावनकुळे म्हणाले,'

ढोल-ताशा परंपरेचा उगम पुण्यात झाला. मात्र, ढोल-ताशांचे वादन ही राज्याची सांस्कृतिक अस्मिता झाली आहे. त्यांच्या वादनाने चैतन्य निर्माण होते. मनामध्ये अभिमान आणि उत्साह संचारतो. महाराष्ट्राचा हा गजर देशातच नव्हे तर जगात पोहोचवायचा आहे.

ढोल-ताशा हा आपल्या सांस्कृतिक उत्सवाचा आत्मा आहे. त्यामुळे हा अनमोल ठेवा पुढे नेण्याची जबाबदारी आपली आहे.'पथकांच्या अधिकाधिक मागण्या मान्य होण्यासाठी सरकारच्या माध्यमातून प्रयत्न करणार असल्याचेही बावनकुळे यांनी सांगितले.पराग ठाकूर यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले,'राज्यात एक हजार ढोल-ताशा पथके असून दीड लाख वादक वादन करीत आहेत. या तरुणांना आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याचे प्रशिक्षण दिले तर, नैसर्गिक संकटांच्या काळात हे तरुण कामी येतील.'ॲड. शिरीष थिटे यांनी सूत्रसंचालन केले.ढोल-ताशा महासंघातर्फे आयोजित 'ढोल-ताशा पथकांच्या पहिल्या राज्यस्तरीय अधिवेशना'चे उद्घाटन चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे विश्वस्त राजेश पांडेताशा महासंघाचे अध्यक्ष पराग ठाकूर, बीएमसीसीचे प्राचार्य डॉ. राजेश सुपेकर या वेळी उपस्थित होते.

### ढोल-ताशा उत्सवाचा आत्मा

पाटील म्हणाले, 'वाद्यांच्या वादनाने माणसाला आत्मिक समाधान प्राप्त होते. राज्यातील वाद्यांची परंपरा मोठी आहे. ती काळासोबत विकसित होत गेली. वेगवेगळ्या वाद्यांचा समावेश विविध प्रकारच्या वादनांमध्ये होत गेला. आता ढोल-ताशा पथकांनीही वेगवेगळ्या वाद्यप्रकारांचा समावेश पथकांमध्ये करावा.'बावनकुळे म्हणाले, 'ढोल-ताशा परंपरेचा उगम पुण्यात झाला. मात्र, ढोल-ताशांचे वादन ही राज्याची सांस्कृतिक अस्मिता झाली आहे. त्यांच्या वादनाने चैतन्य निर्माण होते. मनामध्ये अभिमान आणि उत्साह संचारतो. महाराष्ट्राचा हा गजर देशातच नव्हे तर जगात पोहोचवायचा आहे. ढोल-ताशा हा आपल्या सांस्कृतिक उत्सवाचा आत्मा आहे.

# औद्योगिक क्षेत्रातील प्रदूषणाचा प्रश्न ऐरणीवर

## जलप्रदूषण यावर ठोस पावले उचलण्याची मागणी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चाकण परिसरात मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या बांधकामामुळे वाढलेले वायुप्रदूषण, नाल्यांतून थेट नदीत सांडपाणी मिसळत असल्याने होणारे जलप्रदूषण यावर ठोस पावले उचलण्याची मागणी उद्योगांच्या वतीने शासकीय यंत्रणांसमोर करण्यात आली. याचबरोबर पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी योगदान देण्याची भूमिकाही उद्योगांच्या प्रतिनिधींनी घेतली.**




फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रीजच्या वतीने चाकणमधील पर्यावरणाशी निगडित समस्यांवर चर्चा करण्यासाठी विविध शासकीय यंत्रणांसोबत नुकतीच बैठक घेण्यात आली. या बैठकीत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितीन गोरे, प्रादेशिक अधिकारी जगन्नाथ साळुंखे, चाकण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव, चाकण वनपरिक्षेत्राचे अधिकारी संतोष कांत यांच्यासह चाकणमधील सुमारे ७० कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.या बैठकीत फेडरेशनचे मुख्याधिकारी दिलीप बटवाल यांनी चाकणमधील पायाभूत सुविधांसह प्रदूषणाची समस्या मांडली. ते म्हणाले की, चाकण परिसरातील ओढे भामा नदीला येऊन मिळतात आणि या पाण्यावर कुठलीही प्रक्रिया होत नाही. त्यामुळे नाल्यातील पाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प बसवावेत. याबरोबर नदीतील जलपर्णी काढण्यासाठी एका यंत्राची आवश्यकता आहे. चाकण परिसरात मोठ्या प्रमाणात बांधकामे होत असून मोठ्या प्रमाणावर धूळ पसरली आहे त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर घातक परिणाम होत आहे. म्हणून हे प्रदूषण थांबवण्यासाठी एक फॉगर यंत्राची आवश्यकता आहे. प्लास्टिकच्या बाटल्या रस्त्यात व इतरत्र फेकलेल्या असतात. त्यामुळे प्रदूषण होत असल्याने हे थांबविण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी प्लास्टिक बॉटल नष्ट करणारी यंत्रे बसविण्यात यावीत. चाकण औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांपैकी केवळ एक कंपनी चाकण नगर परिषदेच्या हद्दीत आहे. इतर सर्व कंपन्या परिसरातील ११ ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये आहेत. त्यामुळे या कंपन्यांतून चाकण नगर परिषदेला काहीच उत्पन्न मिळत नाही. परंतु या कंपन्यांमधील कामगार आणि अधिकारी चाकण परिसरात वास्तव्यास असल्याने नागरीकरण वाढले आहे. यातून पाणी, कचरा व्यवस्थापन, रस्ते आदी पायाभूत सुविधांवर ताण येत आहे. निधीअभावी ही कामे करण्यात चाकण नगर परिषदेला मर्यादा येत असल्याने कंपन्यांनी त्यांच्या सामाजिक दायित्व निधीतून या समस्या सोडविण्यासाठी पुढे यावे, या बैठकीत अनेक उद्योग प्रतिनिधींनी याबाबत प्रश्न उपस्थित केले. एमईपीएल कंपनी करारामध्ये ठरलेल्या दरापेक्षा जास्त व अवाजवी दर आकारणी करते.

### एकत्र येऊन काम करणे गरजेचे

हे काम करणाऱ्या समांतर कंपन्यांनाही घातक कचरा गोळा करून व्यवस्थापनाचे काम दिले जावे, अशी मागणीही करण्यात आली.वाढते औद्योगिकीकरण आणि नागरीकरण याच्यामुळे समस्या निर्माण होत आहेत. त्या सोडविण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे. याचबरोबर समस्या निर्माणच होऊ नये यासाठीही काम करणे आवश्यक आहे.

## हिंदू देवतांबद्दल अपशब्द व अपमानास्पद भाष्य करणाऱ्यांना चाप

# धर्मांतराच्या कारस्थानाचा बंदोबस्त!

### आमदार महेश लांडगे यांच्या आक्रमक भूमिकेनंतर सात जणांवर गुन्हा

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिरूर टाकळीहाजी (ता. शिरूर) येथील परिसरातील उचाळेवस्ती येथे हिंदू देवतांबद्दल अपशब्द व अपमानास्पद भाष्य करणे आणि ख्रिश्चन धर्मात येण्यासाठी दबाव टाकण्यात आला. यानंतर भेदरलेल्या संबंधित कुटुंबाने पोलिसांकडे धाव घेतली. मात्र, पोलिसांनी हात वर केल्यानंतर हा प्रकार भाजपाचे आमदार महेश लांडगे यांच्या कानावर घालण्यात आला. अखेर या धर्मांतराच्या कारस्थानाचा बंदोबस्त करण्यात आला.**




आमदार लांडगे यांनी आक्रमक भूमिका घेतल्यानंतर ख्रिश्चन धर्मात येण्यासाठी मतपरिवर्तन केल्याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात सात जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, शिरूर परिसरामध्ये अशाप्रकारे ठराविक धर्मात येण्यासाठी नागरिकांवर आमिष आणि दबाव आणला जात आहे. नागरिकांचे मत परिवर्तन करण्यासाठी काही मंडळी गावागावात फिरत असल्याचा आरोप बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी केला आहे.

ख्रिश्चन धर्मात येण्यासाठी दबाव आणल्या प्रकरणी शेतकरी राहुल मारुती गायकवाड (वय ३९, रा. उचाळेवस्ती-टाकळीहाजी, ता. शिरूर, जि. पुणे) यांनी शिरूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याप्रकरणी प्रशांत जालिंधर घोडे (रा.उचाळेवस्ती-टाकळी हाजी, ता. शिरूर, जि. पुणे), मोजस बार्बनबस डेव्हिड (रा.२०४ लिव्ह गॅलेक्सी, गोकुळ सोसायटी, डोरेबाळा रोडनागपुर ता. जि. नागपुर), अमोल विठ्ठलराव गायकवाड (रा. प्लॉट नं. १४६९, आयुषी अपार्टमेंट, न्यु नंदनवन नागपुर, ता. जि. नागपुर), योगेश संभुवेल रक्षत (रा.६/१७, रामबाग कॉलनी, मेडीकल चौक नागपुर, ता. जि. नागपुर), जेसी ऍलिस्टर अँथोनी (रा.२०२ गणराज फोर रेसिडेन्सी, टाकळी, नागपुर, ता.जि. नागपुर), कुणाल जितेश भावणे (रा. बाजारचौक-आंधळगाव, ता. मोहोळ, जि. भंडारा), सिध्दांत सदार कांबळे (रा. रेड्डी इन क्लब मुंढवा, केशवनगर, हनुमान नगर, पुणे) या सात आरोपींवर गुन्हा दाखल केला आहे.

शिरूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी (१ मे रोजी) सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास राहुल गायकवाड हे आपल्या कुटुंबासोबत घरासमोर बसले होते. यावेळी प्रशांत जालिंदर घोडे व त्याच्यासोबत सहा अनोळखी व्यक्ती त्यांच्या घरी आले. "तुम्ही कोणत्या धर्माचे?" अशी विचित्र चौकशी करत,"बायबल वाचा, चर्चमध्ये या, तुमच्यावर प्रभु येशूची कृपा होईल," असे सांगत धर्मपरिवर्तनासाठी दबाव टाकला." तुमच्या देवांनी काय केलं?" असा सवाल करत, सात जणांचे टोळके उचाळेवस्ती येथील गायकवाड कुटुंबाच्या दारात येऊन बसला! "प्रभु येशूला मान्य करा, चर्चमध्ये या, आर्थिक फायदा होईल असे अमिष दाखवले. त्यानंतर भेदरलेल्या गायकवाड कुटुंबीयांनी पोलिसांकडे धाव घेतली.

सुरुवातीला पोलिसांनी या घटनेबाबत दखल घेतली नाही. मात्र, आमदार महेश लांडगे यांच्या कानावर हा प्रकार जातच त्यांनी आक्रमक भूमिका घेतली. त्यानंतर शिरूर पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

#### धर्मपरिवर्तनासाठी गावागावात नागरिकांवर दबाव...

शिरूर परिसरामध्ये वारंवार धर्म परिवर्तनासाठी दबाव आणला जात आहे. मात्र पोलिसांकडून याबाबत योग्य कारवाई केली जात नाही. वेळीच कारवाई होत नसल्यामुळे धर्म परिवर्तनासाठी फिरणाऱ्या लोकांचे फावले आहे, असा आरोप बजरंग दलाच्या वतीने करण्यात आला आहे. पोलिसांनी अशा प्रकारांवर तातडीने गुन्हा दाखल करावा अशी मागणी करण्यात येत आहे.

> धर्म परिवर्तन करण्यासाठी नागरिकांवर दबाव आणणे. त्यासाठी गावागावात फिरणे. हिंदू देवदेवतांचा अपमान करणे. अवमानकारक भाषा वापरणे हे सर्व प्रकार जाणीवपूर्वक केले जात आहेत. अशा प्रकाराबाबत तक्रार आल्यानंतर पोलिसांनी याबाबत कडक कारवाई तात्काळ करणे अपेक्षित आहे. वेळीच असे प्रकार रोखले नाही तर समाजातील अनुचित घटना वाढत जातील. राज्य सरकारनेही या प्रकारांची दखल घेतली आहे.
> **-महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

## पुणे - जोधपूर एक्सप्रेसचा चिंचवड रेल्वे स्थानकावर थांबा!

### राजस्थानी समाज बांधवांना मोठा फायदा; चिंचवड प्रवासी संघाच्यावतीने स्वागत

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।


**पुणे दैनदिन रेल्वेला रेल्वे मंत्रालयाकडून मान्यता देण्यात आल्यानंतर शनिवारी (दि. ३) सायंकाळी चिंचवड रेल्वे स्थानकावर रेल्वेचे आगमन झाले. यावेळी चिंचवड प्रवासी संघाच्यावतीने रेल्वेचे पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले..**




चिंचवड प्रवासी संघाने ही एक्सप्रेसगाडी दैनदीन चालू व्हावी, यासाठी अथक प्रयत्न केले. रेल्वे मंत्री, मध्य रेल्वेचे सरव्यवस्थापक आदींना वेळोवेळी लेखी निवेदने दिली. प्रथम सप्ताहात एक दिवस, नंतर तीन दिवस व आता दैनदिन थांबा चिंचवड रेल्वे स्थानकावर येता-जाता मिळाला आहे. या थांब्यामुळे शहरातील राजस्थानी समाज बांधव, वसई रोड, सुरत, अहमदाबाद आदी ठिकाणी जाणाऱ्या व तेथून येणाऱ्या प्रवाशांची सोय होणार आहे. ३ मे रोजी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते रेल्वेला हिरवा झेंडा दाखविण्यात आला . शनिवारी (दि. ३) सायंकाळी चिंचवड रेल्वे स्थानकावर एक्सप्रेसचे आगमन झाले. तेथे इंजिनाला स्थानक प्रमुख शोभा वर्मा यांच्यासह चिंचवड प्रवासी संघाचे अध्यक्ष गुलामअली भालदार, मनोहर जेठवानी, मुकेश चुडासमा यांच्या हस्ते पुष्पहार घालण्यात आला. शमशुद्दीन भालदार, मनोज चौगुले, आत्मप्रकाश मटाई, पं. हरेश शर्मा, राजस्थान समाज बांधवांचे प्रमुख हरीश वर्मा, मालाराम माळी आदींनी घोषणा देत प्रवाशांना पेढे, लाडू वाटून एक्सप्रेसचे स्वागत केले. यावेळी चिंचवड रेल्वे स्थानकावर वरिष्ठ पोलीस निरीक्षक भास्कर तिवारी, सहायक पोलीस निरीक्षक अनिल सरवदे, दत्ता इंदीलवार, रेल्वे तिकिट तपासणीस लता दुधाने आदी उपस्थित होते. चिंचवड प्रवासी संघाचे अध्यक्ष गुलामअली भालदार यांनी रेल्वेमंत्र्यांचे आभार मानले. मुंबई - कोल्हापूर सह्याद्री एक्सप्रेस तसेच बारामती - कर्जत पॅसेंजर, पुणे - लोणावळा दरम्यान एक लोकल दुपारची बंद केली आहे. कोरोना संकट काळापासून बंद केली. त्या सर्व सुरू करण्यात याव्यात. पिंपरी - चिंचवड शहरात तसेच तळेगाव परिसरात सातारा, कराड ,सांगली, कोल्हापूर आदी भागातील नागरिक मोठ्या संख्येने नोकरी, व्यवसायानिमित्त स्थायिक झाले असून त्यांना गावाकडे येण्या जाण्यासाठी अनेक समस्यांना सामोरे जाण्याची वेळ येते. त्याना रस्ते मार्गावर अवलंबून रहावे लागत आहे, अशी वैâफीयत मांडली.

पिंपरीचे मनोहर जेठवाणी यांनीही पिंपरी हे व्यापाऱ्याच्या दृष्टीने महत्त्वाचे रेल्वे स्थानक असल्यामुळे येथे कोरोना काळापासून बंद केलेली मुंबई ते कोल्हापूर सह्याद्री एक्सप्रेस त्वरीत सुरू करावी, अशी मागणी केली.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### सत्संगतीत रहावे

नेहमी संतांची संगत धरावी. परमार्थाला संतांचे अधिष्ठान आवश्यक आहे. संत आपल्याजवळच असतात, त्यांना पहायला कुठे जावे लागत नाही. चित्त शुद्ध नसेल तर संतांच्या जवळ जाऊन तरी काय उपयोग होणार ? त्यांना आपण देहात पाहू नये. संत हे काही देहात नसतात, ते जे काही सांगतात त्या साधनात ते असतात. आपली विषयलालसा सोडल्याशिवाय त्यांची भेट होणे शक्य नाही. संताकडे एखादा चोर गेला तर त्याला त्याची खरी भेट होईल का ? तो ज्या हेतूने जातो त्या हेतूने त्याला फार तर तिथे चोरी करता येईल, परंतु संतांपासून जे खरे मिळवायचे ते साधेल का ? आपण जर चित्त शुद्ध करून गेलो तर आपल्याला त्यांची भेट होते; आणि भेट झाल्यावर, जे त्रिभुवनातही मिळणार नाही ते ते देतात.

एकजण एका संताकडे नेहमी दर्शनाला येत असे. तिथे इतर मंडळीही पुष्कळ असत, पण तो कुणाशीही बोलत नसे, कुणी काही विचारले तर उत्तर देत नसे, सदा मुद्रा खिन्न असे. कुणालाही त्याच्याशी बोलावे असे वाटत नसे. असे काही दिवस गेले. पुढे एके दिवशी ते सद्गुरू म्हणाले, "माझा तो वेडा कुठे आहे ? तो आज का आला नाही ?" हे त्याने ऐकताच तो आनंदाने उड्या मारू लागला, आणि जो तिथून गेला तो पुन: आलाच नाही ! तो कशाला येईल ? गुरूने एकदा आपल्याला 'आपले' म्हणावे हेच शिष्याला मिळवायचे असते. ते त्या गृहस्थाने ओळखले आणि म्हणून त्याचे काम झाले. गुरू तुम्हाला 'तुम्ही माझे झाला' असे म्हणत असतानासुद्धा तुम्ही ते ओळखत नाही, कारण तुम्ही विषय बरोबर घेऊन आलेले असता, आणि विषयाची प्राप्ती व्हावी असा हेतू मनात असतो. याउलट, गुरू तुम्हाला निवृत्ती देतात. निवृत्ती दिल्यावर विषयाची प्राप्ती व्हावी ही आठवणच जाते; जसे, तहान लागल्यावर पाणी हवेसे वाटते, पण तेच पाणी पोटभर प्याल्यावर नकोसे वाटते, म्हणजे त्याची निवृत्ती होते. आपला यावर आज विश्वास बसायचा नाही; पण हा विश्वास बसायला भगवंताचे नामस्मरण केले पाहिजे. नामाने ते कार्य होते, म्हणून नामस्मरण करीत जावे. नामाने काळजी वाटेनाहीसे होते आणि मग तळमळही आपोआप जाते. मन आपल्याला विषयाचा आहेर करीत असताना आपण त्याला नामाचा आहेर करावा. आपण आपल्या अंत:करणाला नामाची धग लावावी; त्याने अंत:करण उकळले की दोष वर येतील; ते काढून टाकले की, अंत:करण शुद्ध होईल. शुद्ध अंत:करण ठेवून नाम घेतले तर भगवंताच्या कृपेचा अनुभव येईल. नामानेच अंतरंग शुद्ध बनते. नामानेच मन अंतरात प्रवेश करून स्थिर बनते.

बोधवचन:- संत सांगतील तेच करणे हीच त्यांची खरी सेवा होते.



## 'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**पहलगामच्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताच्या हवाई दलाने आणि नौदलाने अरबी समुद्रात युद्धसराव सुरू केला आहे. त्यामुळे पाकड्यांच्या उरात धडकी भरली असून प्रचंड घबराट पसरली आहे. काहीनेत्यांनी तर कॅनडाला जाऊन तेथे आश्रय देखील घेतला आहे.**

# भारताचे हवाईहल्ले रोखण्यासाठी, चिनी क्षेपणास्त्रे,सध्या पाकड्यांकडे!




### भारताच्या युद्ध सज्जतेने धडकी..

एकूणच भारताची युद्ध सामग्री पाहून पाकिस्तानच काय, त्यांचा आश्रयदाता चीन सुद्धा हादरला आहे. भारताच्या विमानांविरोधात वापरण्यासाठी चीन पाकिस्तानला काही क्षेपणास्त्रे देऊ शकतो. भारताच्या राफेलच्या तुलनेत चीनकडे कोणती क्षेपणास्त्रे आहेत ?, याची गोपनीय माहिती भारतीय गुप्तचरांनी काढली आहे.

### वाकड्यांना युद्धाचे गांभीर्य नाही..

पाकड्यांचे लष्कर, हवाई दल आणि नौदल भारताच्या सीमेजवळ सराव करत आहे. पण त्यांना अजून लढायचे गांभीर्य आलेले नाही. त्यांनी प्रत्यक्ष नियंत्रण रेषेजवळ रणगाडे आणण्यापासून ते लढाऊ विमानांच्या क्षेपणास्त्रांसह गस्त घालणे आणि समुद्रात नौदलाच्या 'लाईव्ह फायर ड्रिल' चाही समावेश आहे.

### चिनी क्षेपणास्त्रे भारताच्या दिशेने..

पाकड्यांच्या लष्कराची रोजच आगळीक दिसत असून रात्री बारा वाजता त्यांच्याकडून गोळीबार होत आहे. पाकिस्तानी हवाई दलाची लढाऊ विमाने चिनी क्षेपणास्त्रांसह उडत आहेत. भारत पुन्हा 'एअर स्ट्राईक' करणार तर नाही ना, अशी भीती पाकिस्तानला वाटत आहे, त्यांचे लष्करप्रमुख आणि पंतप्रधान उघडपणे ही भीती व्यक्त करीत आहेत.

### कोणकोणती चिनी क्षेपणास्त्रे..

भारतीय हवाईदलाच्या राफेल लढाऊ विमानांच्या उड्डाणांमुळे पाकिस्तानी हवाईदल अडचणीत आले आहे. त्यामुळेच भारताच्या राफेलला प्रत्युत्तर देण्यासाठी पाकिस्तानने चीनकडून हवेतून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्रे खरेदी (?) केली आहेत. भारताच्या राफेलचा मुकाबला करण्यासाठी चीनकडे कोणती क्षेपणास्त्रे आहेत, ज्यावर पाकिस्तान उड्या मारत आहे.

### पाहू तर कोणती क्षेपणास्त्रे?

त्यांच्याकडे असलेले पीएल - ८ क्षेपणास्त्र इस्रायलच्या पायथन-३ क्षेपणास्त्राची नक्कल मानले जाते. राफेल ॲडव्हान्स्ड डिफेन्स सिस्टीमने पायथन-३ विकसित केले आहे. चीनचे पीएल-८ क्षेपणास्त्र त्यावेळी इस्रायलच्या सहकार्याने तयार करण्यात आल्याचा दावा अनेक तज्ज्ञांनी केला आहे. हे क्षेपणास्त्र मॅक ३.५ मॅक वेगाने उड्डाण करण्यास सक्षम आहे. या क्षेपणास्त्राची मारक क्षमता २० किलोमीटर आहे.

### पीएल- १० ची मर्यादित रेंज..

पीएल- १० क्षेपणास्त्राची मर्यादित रेंज लक्षात घेऊन चीनने पीएल- ८ क्षेपणास्त्राची निर्मिती केली. याला पीएल-ॲडव्हान्स्ड शॉर्ट रेंज मिसाईल म्हणूनही ओळखले जाते. चीनच्या हवेतून हवेत मारा करणाऱ्या क्षेपणास्त्रांपैकी हे सर्वात प्रगत क्षेपणास्त्र आहे. त्याची तुलना अमेरिकेच्या क्षेपणास्त्रांशी केली जाते. हे क्षेपणास्त्र ९० अंशाच्या कोनातही फिरण्यास सक्षम असल्याचा चीनचा दावा आहे. 'इमेजिंग इन्फ्रारेड' ने सुसज्ज असल्याने हे क्षेपणास्त्र आपले लक्ष्य अधिक चांगल्या प्रकारे ओळखते.

### पीएल-१२ चा हवेतून हवेत मारा..

पीएल- १२ हे हवेतून हवेत मारा करणारे सक्रिय रडार गाईडेड व्हिज्युअल रेंज (बीव्हीआर) क्षेपणास्त्र आहे. चीनच्या या क्षेपणास्त्राची तुलना अमेरिकन एआयएम- १२० एएमआरएएम आणि रशियन आर-७७ शी करता येईल. या क्षेपणास्त्राच्या विकासासाठी वायम्पेल एनपीओ आणि रशियाच्या अगेट यांनी मदत केली आहे. हे क्षेपणास्त्र चिनी लढाऊ विमान जेएच-7, जे-8 एफ, जे-10, जे-11 बी, जे-15, सीएसी/पीएसी जेएफ-17 आणि एफटीसी-2000 जी मधून प्रक्षेपित केले जाऊ शकते.

### रडार गाईडेड पीएल-१५.

पीएल-१५ हे हवेतून हवेत मारा करणारे सक्रिय रडार गाईडेड क्षेपणास्त्र आहे. चीनला हे क्षेपणास्त्र अमेरिकेच्या एआयएम- १२० डी सारखे बनवायचे होते. पीएल-१५ हे लुओयांगस्थित कामा कंपनीने विकसित केले आहे. हे क्षेपणास्त्र चेंगदू जे- १० सी, शेनयांग जे-१६ आणि चेंगदू जे-२० लढाऊ विमानांवर तैनात करण्यात आले आहे. ड्युअल पल्स रॉकेट मोटरने सुसज्ज असल्याने या क्षेपणास्त्राची रेंज आणि वेग चांगला आहे. पीएल-१५ क्षेपणास्त्राची मारक क्षमता २०० किलोमीटरपेक्षा जास्त आहे. हे क्षेपणास्त्र इलेक्ट्रॉनिक पद्धतीने स्कॅन केलेले आणि रडार साधकाने सुसज्ज आहे.

### पीएल-१७ क्षेपणास्त्र आणि दहशत..

चीनच्या पीएल-१७ क्षेपणास्त्राविषयी फारशी माहिती उपलब्ध नाही. याला पीएल-वीस असेही म्हणतात. हवेतून हवेत मारा करणारे हे लांब पल्ल्याचे क्षेपणास्त्र आहे. हे क्षेपणास्त्र शत्रूच्या हवाई इंधन भरणाऱ्या आणि अवॉक्स विमानांना लक्ष्य करण्यासाठी खास डिझाइन करण्यात आले आहे, जे त्यांच्या हवाई हद्दीत चांगले कार्य करतात. चीनने हे क्षेपणास्त्र गुप्त शस्त्र म्हणून सुरक्षित ठेवले आहे आणि त्याची दहशत प्रचंड आहे.

### क्षेपणास्त्रे आहेत, पायलट भयभीत..

चीनने पाकिस्तानला मोठ्या प्रमाणावर क्षेपणास्त्रांचा पुरवठा केला असला तरी ती डागण्याची क्षमता असणारे तज्ज्ञ पायलट पाकिस्तानकडे आहेत का हा खरा प्रश्न आहे. पण एकूणच परिस्थिती पाहता आणि भारताची युद्धसज्जता पाहता पाकड्यांची घाबरगुंडी उडाली आहे, हे मात्र नक्की !

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव. (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा उपक्रम!

## आंदबोरी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला 2 लाखांचे बक्षीस

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**शाळेला गावाचा आधार असावा आणि गावाला शाळेचा अभिमान असावा, या उक्तीला साजेसा आदर्श दाखवत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आंदबोरी (चि.) ता.किनवट या शाळेने 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' या उपक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यात तालुक्यातील द्वितीय क्रमांक पटकावत २ लाख रुपयांचे बक्षीस मिळवले आहे.**



या उपक्रमाअंतर्गत शाळांची वस्तुनिष्ठ मूल्यांकन चाचणी पंचायत समितीच्या पथकाद्वारे करण्यात आली. यात पायाभूत सुविधा, शासनाच्या विविध शैक्षणिक योजनांची अंमलबजावणी, शैक्षणिक संपादने या १५० गुणांच्या निकषांवर तपासणी झाली होती. आंदबोरी (चि.) शाळेने शैक्षणिक गुणवत्ता आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. शाळेत डिजिटल वर्ग, सीसीटीव्ही सुरक्षायंत्रणा, बोलक्या भिंती, शालेय बचत बँक, आनंददायी शनिवार, स्पर्धा परीक्षा तयारी, डिजिटल ई-लर्निंग, तंबाखूमुक्त शाळा, परसबाग, सहली, क्रीडा महोत्सव अशा उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जात आहे.शाळेच्या या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी गंगाधर राठोड, विस्तार अधिकारी वैशाली आडगावकर, केंद्रप्रमुख अविनाश दासरवार, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष राजू जाधव व उपाध्यक्ष अंबादास पवार यांनी मुख्याध्यापक ज्ञानेश्वर शेळके, सुदर्शन येरावार, प्रल्हाद गित्ते, नितीन सावरगावे, अकबर मोमीन व रूपाली तेलंग यांचे अभिनंदन केले. सध्या शाळेत ११४ विद्यार्थी शिक्षण घेत असून सहा शिक्षक कार्यरत आहेत. हे सर्व शिक्षक गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत. शाळेतील सकारात्मक बदल पाहून ग्रामस्थ भारावून गेले असून अनेक पालक इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांचे जिल्हा परिषद शाळेत पुनःप्रवेश करत आहेत, अशी माहिती मुख्याध्यापकांनी दिली.आंदबोरी हे गाव नांदेड – तेलंगणा सीमेवर आहे. या गावात आजही महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची बस जात नाही. येथील सर्व व्यवहार हे तेलंगणातल्या अदिलाबाद येथून होतात. पूर्वी या गावातील शाळेची परिस्थिती अत्यंत दयनिय होती. पण गेल्या काही वर्षात शिक्षकांनी केलेल्या प्रयत्नांमुळे शाळेचा काया पालट झाला आहे. विशेष म्हणजे दोन दशकापूर्वी याच गावातील विद्यार्थी नांदेडमधून शिक्षण घेऊन वेगवेगळ्या पदांवर कार्यरत आहेत. या उपक्रमाअंतर्गत शाळांची वस्तुनिष्ठ मूल्यांकन चाचणी पंचायत समितीच्या पथकाद्वारे करण्यात आली. यात पायाभूत सुविधा, शासनाच्या विविध शैक्षणिक योजनांची अंमलबजावणी, शैक्षणिक संपादने या १५० गुणांच्या निकषांवर तपासणी झाली होती. आंदबोरी (चि.) शाळेने शैक्षणिक गुणवत्ता आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. शाळेत डिजिटल वर्ग, सीसीटीव्ही सुरक्षायंत्रणा, बोलक्या भिंती, शालेय बचत बँक, आनंददायी शनिवार, स्पर्धा परीक्षा तयारी, डिजिटल ई-लर्निंग, तंबाखूमुक्त शाळा, परसबाग, सहली, क्रीडा महोत्सव अशा उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जात आहे.शाळेच्या या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी गंगाधर राठोड, विस्तार अधिकारी वैशाली आडगावकर, केंद्रप्रमुख अविनाश दासरवार, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष राजू जाधव व उपाध्यक्ष अंबादास पवार यांनी मुख्याध्यापक ज्ञानेश्वर शेळके, सुदर्शन येरावार, प्रल्हाद गित्ते, नितीन सावरगावे, अकबर मोमीन व रूपाली तेलंग यांचे अभिनंदन केले. सध्या शाळेत ११४ विद्यार्थी शिक्षण घेत असून सहा शिक्षक कार्यरत आहेतशाळेतील सकारात्मक बदल पाहून ग्रामस्थ भारावून गेले असून अनेक पालक इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांचे जिल्हा परिषद शाळेत पुनःप्रवेश करत आहेत.

### गावाला शाळेचा अभिमान असावा

आंदबोरी हे गाव नांदेड – तेलंगणा सीमेवर आहे. या गावात आजही महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची बस जात नाही. येथील सर्व व्यवहार हे तेलंगणातल्या अदिलाबाद येथून होतात. विशेष म्हणजे दोन दशकापूर्वी याच गावातील विद्यार्थी नांदेडमधून शिक्षण घेऊन वेगवेगळ्या पदांवर कार्यरत आहेत.शाळेला गावाचा आधार असावा आणि गावाला शाळेचा अभिमान असावा, या उक्तीला साजेसा आदर्श दाखवत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आंदबोरी (चि.) ता.किनवट या शाळेने 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' या उपक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यात तालुक्यातील द्वितीय क्रमांक पटकावत २ लाख रुपयांचे बक्षीस मिळवले आहे.

# महाराष्ट्राला पहिल्या क्रमांकाचे राज्य करणार!

## पर्यटनाला चालना देण्यासाठी वर्षभराचे पर्यटन कॅलेंडर

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राज्यातील पर्यटन स्थळे,गड किल्ले,विस्तीर्ण समुद्रकिनारा, पश्चिम घाटातील दुर्मिळ जैव संपदा, लोकसंस्कृती, ग्राम संस्कृती आणि खाद्य संस्कृती या सर्व बाबी विचारात घेऊन राज्याला पुढील काही वर्षात पर्यटनाच्या बाबतीत देशात पहिल्या क्रमांकाचे राज्य बनविणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाबळेश्वर येथे दिली.**



महाबळेश्वर महा पर्यटन महोत्सवाच्या सांगता समारंभात मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, पर्यटन व पालकमंत्री शंभूराज देसाई, उद्योग मंत्री उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, आमदार अतुल भोसले, सचिन पाटील, जिल्हाधिकारी संतोष पाटील, आदिती भारद्वाज,वैशाली कडुकर, मुख्याधिकारी योगेश पाटील आदी उपस्थित होते.राज्यात आज अनेक छोटी मोठी पर्यटन स्थळे, पाच जागतिक वारसा स्थळे, व्याघ्र प्रकल्प, प्रेक्षणीय गड किल्ले, साडेसातशे किलोमीटरचा विस्तीर्ण समुद्रकिनारा, मोठी लोक,ग्राम आणि खाद्य संस्कृती असा मोठा विस्तीर्ण पर्यटनाचा खजिना उपलब्ध असताना सुद्धा देशाच्या पर्यटनाच्या नकाशावर आपण पाचव्या क्रमांकावर आहेत. मात्र यापुढे पर्यटन स्थळांचा पुरेपूर वापर करून आपण पहिल्या क्रमांकाला आल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.काही हजार कोटींच्या औद्योगिक गुंतवणुकीतून आपण शेकडो रोजगार उपलब्ध करू शकतो. मात्र फक्त शंभर कोटींच्या पर्यटनाच्या गुंतवणुकीतून आपण दहा हजार रोजगार उपलब्ध करू शकतो. त्यामुळे पर्यटनाच्या माध्यमातून ही आपण रोजगार उभे करणार आहोत.

### दहा हजार रोजगार उपलब्ध करू

कोयना धरणाच्या शिवसागर जलाशयासारख्या उपलब्ध नैसर्गिक व पायाभूत सुविधांचा पुरेपूर वापर करून मुनावळे येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचा बोट क्लब, स्कुबा ड्रायव्हिंग, वॉटर स्पोर्ट्स ला परवानगी दिली आहे.देशातील पहिलं स्कुबा ड्रायव्हिंग प्रशिक्षण केंद्र राज्यात उभारला आहे. काही किरकोळ सुविधांच्या माध्यमातून आपण जागतिक आणि देशातील पर्यटकांना आकर्षित करू शकतो.गणपती उत्सव, गणपती विसर्जन मिरवणूक, पंढरीची वारी, आषाढी एकादशी, राज्यात होणारे उत्सव, महोत्सव,मोठ्या जत्रा तेथील संस्कृती अशा अनेक बाबींचा वापर आपण पर्यटनासाठी उपयोग करू शकतो. पर्यटनाला चालना देण्यासाठी वर्षभराचे पर्यटन कॅलेंडर तयार करण्याची, अद्यावत संकेतस्थळावर सर्व बाबी उपलब्ध करून देण्याची व सहली आयोजित करणाऱ्या व्यवस्थापकांबरोबर संवाद साधण्याची सूचना पर्यटन विभागाला त्यांनी केली.

# ऑपरेशन ब्लू स्टार ही काँग्रेसची चूक!

## शीख समुदायाबाबत माझ्या मनात आपुलकी: राहुल गांधी

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी अमेरिकेतल्या त्यांच्या दौऱ्यात १९८४ मध्ये झालेलं ऑपरेशन ब्लू स्टार ही काँग्रेसची चूक होती हे मान्य केलं आहे. ८० च्या दशकात ज्या चुका पक्षाकडून झाल्या आहेत त्याची जबाबदारी मी घ्यायला तयार आहे. राहुल गांधींनी एका शीख युवकाच्या प्रश्नावर हे उत्तर दिलं. ज्यानंतर राहुल गांधींवर भाजपाने टीका केली आहे.**





### ऑपरेशन ब्लू स्टार काय होतं?

पण हे सांगू इच्छितो की त्या घटनेची जबाबदारी मी घ्यायला तयार आहे.ब्राऊन विद्यापीठात शीख विद्यार्थी म्हणाला की तुम्ही अजूनही शिखांशी तडजोड करण्याच्या दृष्टीने काही पावलं उचललेली नाहीत. सज्जन कुमार आणि केपीएस गिल यांच्यासारख्या लोकांना राजकीय सुरक्षा देण्यात आली. मग तुम्ही ही अपेक्षा कशी करता की आम्ही भाजपाला घाबरलं पाहिजे? हा प्रश्न विचारला असता राहुल गांधींनी हे उत्तर दिलं आणि ती काँग्रेसची चूक होती हे मान्य केलं. दरम्यान राहुल गांधींचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. त्यानंतर अमित मालवीय यांनी राहुल गांधींवर टीका केली आहे.

दोन आठवड्यांपूर्वी राहुल गांधी यांनी अमेरिका दौरा केला. त्यावेळी ते ब्राऊन विद्यापीठातल्या कार्यक्रमात सहभागी झाले. त्यावेळी तिथल्या शीख विद्यार्थ्याने ऑपरेशन ब्लू स्टारबाबत राहुल गांधींना प्रश्न विचारला. त्यावर राहुल गांधी म्हणाले की काँग्रेसची ती चूक होती. तसंच काँग्रेसच्या ज्या चुका ८० च्या दशकात झाल्या त्याची जबाबदारी मी घ्यायला तयार आहे. मी अनेकदा सुवर्ण मंदिरात गेलो आहे. शीख समुदायाबाबत माझ्या मनात आपुलकी आणि आदर आहे. मात्र ज्या घटना घडल्या त्याची जबाबदारी घ्यायला मी तयार आहे. तसंच जेव्हा ती घटना घडली तेव्हा मी राजकारणातही नव्हतो. पण हे सांगू इच्छितो की त्या घटनेची जबाबदारी मी घ्यायला तयार आहे.ब्राऊन विद्यापीठात शीख विद्यार्थी म्हणाला की तुम्ही अजूनही शिखांशी तडजोड करण्याच्या दृष्टीने काही पावलं उचललेली नाहीत. सज्जन कुमार आणि केपीएस गिल यांच्यासारख्या लोकांना राजकीय सुरक्षा देण्यात आली. मग तुम्ही ही अपेक्षा कशी करता की आम्ही भाजपाला घाबरलं पाहिजे? हा प्रश्न विचारला असता राहुल गांधींनी हे उत्तर दिलं आणि ती काँग्रेसची चूक होती हे मान्य केलं.दरम्यान राहुल गांधींचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. त्यानंतर अमित मालवीय यांनी राहुल गांधींवर टीका केली आहे. राहुल गांधी आता भारतातच नाही तर जगभरात चेष्टेचा विषय ठरले आहेत असं त्यांनी म्हटलं आहे. तर भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते आर. पी. सिंह म्हणाले राहुल गांधी विदेशात जातात आणि देशाच्या विरोधात तिरस्कार पसरवण्याचं काम करतात. त्यांनी भारतात देशाच्या विरोधात बोलून दाखववावं मी त्यांच्या विरोधात खटला दाखल करेन असंही त्यांनी म्हटलं आहे. एनडीटीव्हीने हे वृत्त दिलं आहे.भारतीय सैन्याने पंजाबच्या अमृतसरमधील सुवर्ण मंदिरात घुसून ऑपरेशन ब्लू स्टार फत्ते केलं होतं. स्वतंत्र खलिस्तानच्या निर्मितीसाठी पंजाबमध्ये हिंसा भडकली होती. या हिंसेला हवा देण्याचं काम 'दमदमी टकसाल'चे जनरल सिंग भिंडरावाले यांनी केलं होतं. पंजाबमधील हिंसा, खलिस्तानी चळवळीने निर्माण केलेला उच्छाद मोडीत काढण्यासाठी तत्कालीन दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी ऑपरेशन ब्लू स्टारचे आदेश दिले होते. पुढे त्यांच्या हत्येने देशाला त्याची किंमतही मोजावी लागली. त्यामुळे पंजाबचा इतिहास लिहिताना ऑपरेशन ब्लू स्टार, इंदिरा गांधींची हत्या या गोष्टी प्रामुख्याने डोळ्यासमोर येतात.दोन आठवड्यांपूर्वी राहुल गांधी यांनी अमेरिका दौरा केला. त्यावेळी ते ब्राऊन विद्यापीठातल्या कार्यक्रमात सहभागी झाले. त्यावेळी तिथल्या शीख विद्यार्थ्याने ऑपरेशन ब्लू स्टारबाबत राहुल गांधींना प्रश्न विचारला. त्यावर राहुल गांधी म्हणाले की काँग्रेसची ती चूक होती. तसंच काँग्रेसच्या ज्या चुका ८० च्या दशकात झाल्या त्याची जबाबदारी मी घ्यायला तयार आहे. मी अनेकदा सुवर्ण मंदिरात गेलो आहे. शीख समुदायाबाबत माझ्या मनात आपुलकी आणि आदर आहे. मात्र ज्या घटना घडल्या त्याची जबाबदारी घ्यायला मी तयार आहे. तसंच जेव्हा ती घटना घडली तेव्हा मी राजकारणातही नव्हतो.

# देशाला जे वाटतं आहे ते होणारच

## संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचा पाकिस्तानला इशारा

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी सनातन संस्कृती जागरण महोत्सवात सहभाग घेतला होता. दिल्लीच्या या कार्यक्रमात राजनाथ सिंह यांनी पाकिस्तानला इशारा दिला आहे. मी देशाचा संरक्षण मंत्री आहे, त्यामुळे माझं हे कर्तव्य आहे की मी आपल्या सैनिकांसह आपल्या देशाच्या सीमांचं रक्षण करेन. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कार्यकाळात देशाला जे वाटतं आहे ते होणारच असं म्हणत राजनाथ सिंह यांनी या कार्यक्रमात पाकिस्तानला इशारा दिला आहे.**



### गाईड्सची चौकशी करण्यात आली

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर अनंतनागमध्ये २५ हून अधिक टुरिस्ट गाईड्सची चौकशी करण्यात आली आहे. तपास यंत्रणांना हे माहीत आहे की स्थानिकांच्या मदतीशिवाय हल्ला होणं हे जवळपास अशक्य आहे. त्यामुळे आता तपास यंत्रणा अधिक खोलात जाऊन तपास करत आहेत. दहशतवाद्यांना शोधण्यासाठीची मोहीम आणखी तीव्र करण्यात आली आहे."आपल्या देशाकडे कुणी डोळे वटारुन पाहिले तर त्यांना मुंहतोड उत्तर देणं हे आमचं काम आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींना सगळं माहीत आहे. तसंच तुम्हाला त्यांची कार्यशैली माहीत आहे. पंतप्रधान मोदी जोखीम पत्करु शकतात हे सगळ्यांनाच माहीत आहे. आपल्या देशाकडे डोळे वटारुन पाहणाऱ्या देशाला ते नक्की उत्तर देतील. पंतप्रधान नरेंद्र मोदींची शैली तुम्हाला सगळ्यांनाच माहीत आहे. मी या मंचावरुन तुम्हाला आश्वासन देतो की तुम्हाला जे वाटतं आहे तसंच उत्तर दिलं जाईल.

"आपल्या देशाकडे कुणी डोळे वटारुन पाहिले तर त्यांना मुंहतोड उत्तर देणं हे आमचं काम आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींना सगळं माहीत आहे. तसंच तुम्हाला त्यांची कार्यशैली माहीत आहे. पंतप्रधान मोदी जोखीम पत्करु शकतात हे सगळ्यांनाच माहीत आहे. आपल्या देशाकडे डोळे वटारुन पाहणाऱ्या देशाला ते नक्की उत्तर देतील. पंतप्रधान नरेंद्र मोदींची शैली तुम्हाला सगळ्यांनाच माहीत आहे. मी या मंचावरुन तुम्हाला आश्वासन देतो की तुम्हाला जे वाटतं आहे तसंच उत्तर दिलं जाईल." असं राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे.२०४७ पर्यंत भारत विकसित राष्ट्र होईल असं लक्ष्य पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ठेवलं आहे. हे लक्ष्य छोटं नाही हे तर आपण सगळेही समजू शकतो. पण तुम्ही सगळ्यांनी निश्चिंत राहा. हे लक्ष्य पूर्ण होणार म्हणजे होणारच आंतरराष्ट्रीय स्तरावर पंतप्रधान नरेंद्र मोदींमुळे वाजतो आहे. आपल्या देशाची किर्ती आंतरराष्ट्रीय स्तरावर वाढली आहे. पूर्वी अशी स्थिती होती की भारताने काहीही म्हटलं तरीही ती बाब गांभीर्याने घेतली जात नसे. भारत कमकुवत देश आहे असं म्हटलं जात होतं. आज मात्र ती परिस्थिती नाही. आंतरराष्ट्रीय स्तरावर भारत जे म्हणणं मांडतो ते गांभीर्याने घेतलं जातं.

# माधुरी माझ्यापेक्षा जास्त 'फेमस'; डॉ. नेने पत्नीविषयी काय म्हणाले?

माधुरी दीक्षितचे पती डॉ. श्रीराम नेनेंनी २०११ मध्ये अमेरिकेतील हार्ट सर्जनची नोकरी सोडून भारतात परण्याचा निर्णय घेतला होता. यंदाच्या जानेवारी महिन्यात आयएनकेच्या संस्थापक आणि सीईओ लक्ष्मी प्रॅटुरी यांनी आयोजित केलेल्या एका पॅनेलच्या चर्चेत डॉ. नेने सहभागी झाले होते. यावेळी त्यांनी वैयक्तिक आयुष्यातील बऱ्याच गोष्टींचा खुलासा केला. डॉ. नेनेंचा नोकरी सोडून भारतात येण्याचा निर्णय त्यांच्या आई-बाबांना त्यावेळी पटला नव्हता. याशिवाय माधुरीशी लग्न झाल्यानंतर आयुष्य पूर्णपणे बदलून गेलं असंही ते म्हणाले.डॉ. श्रीराम नेने UCLA ( कॅलिफोर्निया विद्यापीठ-लॉस एंजेलिस ) याठिकाणी हार्ट सर्जन म्हणून काम करायचे. त्यावेळी बऱ्याच सेलिब्रिटींवर उपचार केल्याचं त्यांनी सांगितलं. डॉ. नेने म्हणाले, "मी अनेक सेलिब्रिटींवर उपचार केले आहेत. माझं लग्न होण्याआधी सुद्धा मी बऱ्याच सेलिब्रिटींना



ओळखायचो. पण, लग्नाआधी बाहेरच्या जगात मला फारसं कोणीही ओळखत नव्हतं. माधुरीशी लग्न झाल्यावर परिस्थिती पूर्णपणे बदलली. आता प्रत्येकाला माझ्याबरोबर सेल्फी हवा असतो."डॉ. नेने पुढे म्हणाले, "माझी पत्नी माझ्यापेक्षा जास्त प्रसिद्ध आहे... आणि हे अगदी खरं आहे. मी फक्त जोडीदार म्हणून तिची साथ देतोय. वैयक्तिक आयुष्यात ती प्रचंड नम्र आहे. तिला त्यावेळी अमेरिकेत सुद्धा सर्वत्र ओळखलं जायचं. पण, मी कधीच तिच्याकडे एक अभिनेत्री म्हणून पाहिलं नाही कारण, ती माझी पत्नी आहे, माझी जोडीदार आहे.

## रेखा आरतीला कानशिलात लगावणार

बॉलीवूड अभिनेत्रींमध्ये असलेलं बॉन्डिंग आणि त्यांच्यात असलेली भांडणं ही नेहमीच सोशल मीडियावर चर्चेत असतात. त्यांच्या चाहत्यांना नेहमीच अभिनेत्रींच्या खऱ्या आयुष्यात काय होतंय हे जाणून घेण्याची इच्छा होते. असाच एक किस्सा स्वत: अभिनेत्रीनं सांगितला होता, तेव्हा सगळ्यांना मोठा धक्का बसला होता. हा किस्सा दिग्गज अभिनेत्री रेखा यांच्या संबंधित आहे. आरती छाबडिया ही लोकप्रिय अभिनेत्री आहे. आरती छाबडियाने १९९९ मध्ये मिस इंडिया वर्ल्डवाइडचा किताबही जिंकला आहे. तिने सुखविंदर सिंग यांच्या 'नशा ही नशा है' या गाण्याने आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. यानंतर ती चित्रपटांमध्ये आली. तिने अनेक चित्रपटांमध्ये महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत.आरती छाबडिया आता सोशल मीडियावर फॅशन इन्फ्लुएन्सर म्हणून लोकप्रिय झाली आहे. आरतीनं 'लज्जा' सिनेमातून बॉलीवूडमध्ये एन्ट्री केली होती. या सिनेमात तिच्यासोबत माधुरी दीक्षित, अजय देवगण, रेखा यांच्यासह अनेक लोकप्रिय कलाकारांच्या भूमिका होत्या. या सिनेमाच्या सेटवरचा एक किस्सा सध्या चर्चेत आला आहे.एका सीनमध्ये आरतीला रेखा कानशिलात लगावणार होत्या, पण या गोष्टीची आरतीला कल्पना नव्हती. जेव्हा रेखा यांनी तिच्या कानाखाली मारली तेव्हा आरती ढसाढसा रडू लागली. या गोष्टीचा खुलासा स्वत: आरतीने एका मुलाखतीदरम्यान केला होता. तिने एका मुलाखतीत सांगितलं होतं की, 'लज्जा' चित्रपटाच्या सेटवर रेखा यांनी तिला कानाखाली मारली होती. रेखा यांनी शूटिंगदरम्यान तिला मारल्यानंतर ती ढसाढसा रडू लागली होती." आरतीची परिस्थिती पाहून सिनेमाचे दिग्दर्शक आणि रेखा यांनी तिला समजावलं होतं.

## काय माय जरातर लाजावं की...



नृत्यांगणा गौतमी पाटीलही तिच्या अदांनी आणि नृत्यांनी चात्यांना घायाळ करत असते. गौतमी वेगवेगळ्या कार्यक्रमांमध्ये तिची नृत्यशैली सादर करते. कोणत्या ना कोणत्या कारणांमुळे गौतमी चर्चेत असते. आता गौतमीनं सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओमध्ये ती "सरकार तुम्ही केलंय मार्केट जाम" या गाण्यावर डान्स करताना दिसत आहे. गौतमीचा हा व्हिडीओ पाहिल्यानंतर मात्र आता नेटकरी तिच्यावर भडकले आहेत. गौतमीच्या व्हिडीओला कमेंट करुन अनेकांनी तिला ट्रोल देखील केलं आहे. गौतमीनं इन्स्टाग्रामवर तिचा "सरकार तुम्ही केलंय मार्केट जाम" या गाण्यावरील डान्सचा व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये गौतमी ही स्टेजवर काही लहान मुलींसोबत डान्स करताना दिसत आहे. लहान मुलींसोबत डान्स केल्यानंतर काही नेटकरी गौतमीला ट्रोल करत आहेत. एका नेटकऱ्यानं गौतमीला कमेंट केली, "तू नाच आणि अजून तुझ्या पुढे 10 तयार कर नाचायला. काय माय जरातर लाजावं की. देशाच भविष्य नाचवताना." तर दुसऱ्या युझरनं कमेंट केली, "लहान मुली आहेत एवढी तरी आकल ठेवा" काही नेटकऱ्यांनी गौतमीच्या व्हिडीओला कमेंट करुन तिला ट्रोल केलं तर काहींनी तिच्या नृत्यशैलीचं कौतुक देखील केलं. गौतमीच्या माझा कारभार सोपा नसतोय रं, दिलाचं पाखरू, सरकार तुम्ही केलंय मार्केट जाम,पाटलांचा बैलगाडा या गाण्यांना प्रेक्षकांची विशेष पसंती मिळाली. तिच्या गाण्यांवर नेटकरी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव करतात. गौतमी तिच्या गाण्यांचे व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर करत असते. तिला इन्स्टाग्रामवर 1.5 मिलियन फॉलोवर्स आहेत. काही दिवसांपूर्वी गौतमीचं 'घोटाळा झाला' हे गाणं या युट्यूब चॅनलवर शेअर करण्यात आलं आहे. या गाण्याला देखील नेटकऱ्यांची पसंती मिळाली. तसेच तिचा 'घुंगरु' हा चित्रपट देखील रिलीज झाला.या चित्रपटाचं दिग्दर्शन बाबा गायकवाडयांनी केलं आहे.नृत्यांगणा गौतमी पाटील ही तिच्या अदांनी आणि नृत्यांनी चात्यांना घायाळ करत असते. गौतमी वेगवेगळ्या कार्यक्रमांमध्ये तिची नृत्यशैली सादर करते. कोणत्या ना कोणत्या कारणांमुळे गौतमी चर्चेत असते.

## दत्तू मोरेने दिली आनंदाची बातमी!

'महाराष्ट्राची हास्यजत्रा' कार्यक्रमामुळे अनेक नवोदित कलाकार प्रसिद्धीझोतात आले. या शोचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. यापैकीच प्रेक्षकांचा लाडका अभिनेता म्हणजे दत्तू मोरे. दत्तूने नुकताच त्याच्या चाहत्यांना एक सुखद धक्का दिला आहे. लग्नानंतर दोन वर्षांनी अभिनेता बाबा झाला आहे. ही आनंदाची बातमी दत्तूने इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करत सर्वांना दिली आहे. दत्तूच्या घरी चिमुकल्या सदस्याचं आगमन झालेलं आहे. अभिनेत्याला मुलगा झाला आहे. दत्तूने बाळाची पहिली झलक या पोस्टद्वारे शेअर केली आहे. यातील एका फोटोमध्ये दत्तू अन् त्याच्या पत्नीने लेकाचा हात अलगद आपल्या हातांवर धरल्याचं पाहायला मिळत आहे. तर, दुसऱ्या एका फोटोमध्ये दत्तूच्या लेकाने चिमुकल्या हातांनी बाबाचं बोट पकडल्याचं दिसतंय.दत्तूने हे गोड फोटो शेअर करत त्यावर "फायनली... तो आला! WE NOW OFFICIALLY HAVE A TINY HUMAN TO BLAME. माझ्या आयुष्यातील सर्वात मोठा क्षण...मी सदैव कृतज्ञ आहे." असं कॅप्शन दिलं आहे.दत्तूने गुडन्यूज शेअर करताच नेटकऱ्यांसह अभिनेत्याच्या चाहत्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. हास्यजत्रेतील कलाकारांनी सुद्धा कमेंट्समध्ये दत्तूवर शुभेच्छांचा पाऊस पाडला आहे.दरम्यान, २३ मे २०२३ रोजी दत्तूने गुपचूप लग्नगाठ बांधत नव्या आयुष्याला सुरुवात केली होती. त्याचं लग्न साध्या पद्धतीत पार पडलं होतं. दत्तूच्या पत्नीचं नाव स्वाती घुनागे ( मोरे ) असं आहे. स्वाती ही व्यवसायाने डॉक्टर आहे. ती स्त्रीरोग तज्ञ असून गेल्यावर्षी तिने ठाण्यात स्वतःचं क्लिनिक सुरू केलं होतं. याशिवाय स्वाती अनेक सामाजिक कार्यात सक्रीय असते.दरम्यान, सध्या संपूर्ण कलाविश्वातून या जोडप्यावर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात येत आहे. या दोघांच्या लव्हस्टोरीबद्दल थोडक्यात सांगायचं झालं, तर



## सारा 'या' अभिनेत्याला करतेय डेट?

भारतीय संघाचा महान फलंदाज सचिन तेंडुलकरची लेक नेहमीच चर्चेत असते. सारा तेंडुलकर सोशल मीडियावर प्रचंड सक्रिय असते आणि तिच्या फोटो, व्हीडिओवर चाहते लाईक्स, कमेंटसचा चाहते पाऊस पाडतात. सारा तेंडुलकरचं नाव भारताचा क्रिकेटपटू गिलबरोबर जोडलं जात होतं. आता पुन्हा एकदा साराचे नाव याच कारणामुळे चर्चेत आहे. साराचं नाव आता बॉलीवूडमधील अभिनेत्याबरोबर जोडलं जातं. या अभिनेत्याला सारा डेट करत असल्याचा दावा एका रिपोर्टमध्ये केला आहे. शुबमन गिल आणि सारा तेंडुलकर एकमेकांना डेट करत असल्याची नेहमीच चर्चा होत असते. पण आयपीएलदरम्यान शुबमन गिलच्या मुलाखतीतील एका वक्तव्यामुळे या चर्चेला पूर्णविराम मिळाला. गिलला मुलाखतीत त्याच्या वैयक्तिक जीवनाबद्दल विचारले असता त्याने सांगितलं की तो गेली ३ वर्ष सिंगल आहे आणि त्याच्या क्रिकेट करियरवर लक्ष देत आहे. गिलच्या मुलाखतीतील वक्तव्यापूर्वी गिल आणि साराने एकमेकांना इन्स्टाग्रामवर अनफॉलो केल्याने त्यांच्या ब्रेकअपच्या चर्चा होत्या. तर गिलच्या वक्तव्यामुळे या चर्चाही थांबल्या. आता सारा तेंडुलकरचं नाव बॉलीवूड अभिनेत्याबरोबर जोडलं जात आहे.फिल्मफेअरमधील एका वृत्तानुसार, दिग्गज भारतीय फलंदाजाची लेक सारा तेंडुलकर अभिनेता सिध्दांत चतुर्वेदीला डेट करत आहे.

# पंजाबचा लखनौवर दणदणीत विजय!

## किंग्सने 13 वर्षांनी धरमशालाच्या मैदानावर जिंकला सामना

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पंजाब किंग्सने धरमशालाच्या घरच्या मैदानावर लखनौचा धावांनी मोठा पराभव केला आहे. पंजाबने दणदणीत विजय मिळवत प्लेऑफच्या दिशेने मोठं पाऊल टाकलंय. तर लखनौ संघाला आता प्लेऑफसाठी पात्र ठरायचं असेल तर रस्ता खूप अवघड असणार आहे. पण पंजाबविरूद्ध आयुष बदोनीने लखनौकडून एकट्याने कमालीच्या धावा केल्या.**



पंजाब किंग्सने दिलेल्या २३७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना सुरूवात खूप खराब झाली. अर्शदीप सिंगने पॉवरप्लेमध्ये ३ विकेट्स घेत लखनौच्या मुख्य ३ फलंदाजांना माघारी धाडलं आणि लखनौच्या धावांना ब्रेक लावला. मिचेल मार्श आणि एडन मारक्रम तिसऱ्या षटकात बाद झाले तर निकोलस पुरन पाचव्या षटकात बाद झाला. हे तिन्ही विकेट अर्शदीपने घेतले. ऋषभ पंतने यानंतर संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला पण तो १८ धावा करत बाद झाला, तर डेव्हिड मिलर ११ धावा करत बाद झाला. यानंतर आयुष बदोनी आणि अब्दुल समद यांनी संघासाठी भागीदारी रचली. अब्दुल समद २४ चेंडूत २ चौकार आणि ४ षटकारांसह ४५ धावा करत बाद झाला. तरआयुष बदोनीने वादळी खेळी करत लखनौचा डाव सांभाळला. बदोनीने ४० चेंडूत ५ चौकार आणि ५ षटकारांसह ७४ धावांची खेळी केली. तर आवेश खान १० चेंडूत ३ चौकार आणि एका षटकारासह नाबाद १९ धावा केल्या. पंजाबकडून अर्शदीप सिंगने ३ विकेट्स, अझमतुल्ला ओमरझाईने २ विकेट्स घेतले. मार्को यान्सन व चहलने १-१ विकेट घेतली.लखनौने नाणेफेक जिंकत पंजाब किंग्सला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. पंजाबच्या फलंदाजांनी विस्फोटक फलंदाजी करत २० षटकांत २३६ धावांचा टप्पा गाठला. प्रियांश आर्य पहिल्याच षटकात बाद झाला. पण प्रभसिमरन सिंग आणि श्रेयस अय्यर यांनी संघाचा डाव सावरला. तर जोश इंग्लिस १४ चेंडूत १ चौकार आणि ४ षटकारांसह ३० धावा करत बाद झाला. यानंतर प्रभसिमरन सिंग ४८ चेंडूत ६ चौकार आणि ७ षटकारांसह ९१ धावा करत बाद झाला. अवघ्या काही धावांनी त्याचं शतक हुकलं. श्रेयस अय्यरने २५ चेंडूत २४ चौकार आणि २ षटकारांसह ४५ धावा केल्या. तर नेहाल वधेरा १६ धावा करत बाद झाला. शशांक सिंगने विस्फोटक फलंदाजी करत १५ चेंडूत ४ चौकार आणि एक षटकारांसह ३३ धावा करत संघाला मोठी धावसंख्या गाठण्यात योगदान दिलं. लखनौकडून आकाश सिंग आणि दिग्वेश राठीने २-२ विकेट्स घेतले. तर प्रिन्स यादवने १ विकेट घेतली.पंजाब किंग्सने दिलेल्या २३७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना सुरूवात खूप खराब झाली. ३ फलंदाजांना माघारी धाडलं आणि लखनौच्या धावांना ब्रेक लावला. मिचेल मार्श आणि एडन मारक्रम तिसऱ्या षटकात बाद झाले तर निकोलस पुरन पाचव्या षटकात बाद झाला.हे तिन्ही विकेट अर्शदीपने घेतले. ऋषभ पंतने यानंतर संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला पण तो १८ धावा करत बाद झाला, तर डेव्हिड मिलर ११ धावा करत बाद झाला. यानंतर आयुष बदोनी आणि अब्दुल समद यांनी संघासाठी भागीदारी रचली. अब्दुल समद २४ चेंडूत २ चौकार आणि ४ षटकारांसह ४५ धावा करत बाद झाला. तरआयुष बदोनीने वादळी खेळी करत लखनौचा डाव सांभाळला. बदोनीने ४० चेंडूत ५ चौकार आणि ५ षटकारांसह ७४ धावांची खेळी केली. तर आवेश खान १० चेंडूत ३ चौकार आणि एका षटकारासह नाबाद १९ धावा केल्या. पंजाबकडून अर्शदीप सिंगने ३ विकेट्स, अझमतुल्ला ओमरझाईने २ विकेट्स घेतले. मार्को यान्सन व चहलने १-१ विकेट घेतली.लखनौने नाणेफेक जिंकत पंजाब किंग्सला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. पंजाबच्या फलंदाजांनी विस्फोटक फलंदाजी करत २० षटकांत २३६ धावांचा टप्पा गाठला.

### प्रभसिमरन अय्यर यांनी डाव सावरला

प्रियांश आर्य पहिल्याच षटकात बाद झाला. पण प्रभसिमरन सिंग आणि श्रेयस अय्यर यांनी संघाचा डाव सावरला. तर जोश इंग्लिस १४ चेंडूत १ चौकार आणि ४ षटकारांसह ३० धावा करत बाद झाला. यानंतर प्रभसिमरन सिंग ४८ चेंडूत ६ चौकार आणि ७ षटकारांसह ९१ धावा करत बाद झाला. अवघ्या काही धावांनी त्याचं शतक हुकलं.श्रेयस अय्यरने २५ चेंडूत २४ चौकार आणि २ षटकारांसह ४५ धावा केल्या. तर नेहाल वधेरा १६ धावा करत बाद झाला. शशांक सिंगने विस्फोटक फलंदाजी करत १५ चेंडूत ४ चौकार आणि एक षटकारांसह ३३ धावा करत संघाला मोठी धावसंख्या गाठण्यात योगदान दिलं. लखनौकडून आकाश सिंग आणि दिग्वेश राठीने २-२ विकेट्स घेतले. तर प्रिन्स यादवने १ विकेट घेतली.पंजाब किंग्सने धरमशालाच्या घरच्या मैदानावर लखनौचा धावांनी मोठा पराभव केला आहे. पंजाबने दणदणीत विजय मिळवत प्लेऑफच्या दिशेने मोठं पाऊल टाकलंय.

# विराटने माझ्या लेकाला सावरले!

## यश दयालच्या वडिलांनी कोहलीला दिले मुलाच्या कामगिरीचे क्रेडिट

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**आयपीएल २०२५ मध्ये आरसीबीने एकाच सीझनमध्ये दोन वेळा सीएसकेचा पराभव करत मोठा इतिहास घडवला. आरसीबीच्या या विजयाचा हिरो यश दयालदेखील ठरला. ज्याने अखेरच्या षटकात १५ धावांचा बचाव करत संघाला विजय मिळवून दिला.**



२०२४ मध्येदेखील यश दयालने आरसीबीला चेन्नईवर असाच विजय मिळवून दिला होता. शेवटच्या षटकात ५ षटकार खाल्ल्यानंतर एकेकाळी नैराश्यात गेलेला दयाल आज इतका भेदक गोलंदाजी करू शकतो, तर त्यात विराट कोहलीचं महत्त्वाचं योगदान आहे. हे त्याच्या वडिलांनी स्वतः उघड केले आहे.यश दयालने ३ मे ला झालेल्या सामन्यात चेन्नईविरूद्ध अखेरच्या षटकात १५ धावांचा बचाव केला. या षटकात त्याने धोनीला झेलबाद केलं. त्यानंतर शिवम दुबेने एक षटकार लगावला आणि नो बॉलही टाकला पण तरीही यश दयालने उत्कृष्ट यॉर्कर टाकत चांगली गोलंदाजी केली.यश दयालच्या कामगिरीबद्दल त्याच्या वडिलांनी मोठं वक्तव्य केलं आहे. विराट कोहलीमुळेच तो आज मोकळेपणाने खेळत आहे आणि संघाला विजय मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे, असे त्याच्या वडिलांनी सांगितले. त्याचे वडील चंद्रपाल दयाल यांनी खुलासा केला क विराट कोहली आरसीबीमध्ये सामील झाल्यापासून त्याच्याशी खूप चर्चा करतो. तो अनेकदा त्याला त्याच्या खोलीत बोलावतो, बऱ्याच वेळा तो स्वतः यशच्या खोलीत जातो आणि त्याला खेळाबद्दल समजावून सांगत असतो.यश दयालचे वडिल विराटबद्दल सांगताना म्हणाले, “कठोर मेहनत करत राहा, बिनधास्त खेळ तू, मी तुमच्याबरोबर आहे, काळजी करू नकोस, मेहनत करणं थांबवू नको, चुका कर पण त्यातून शिकवण घे आणि पुढे जा.” यश दयालचे वडील पुढे म्हणाले, “विराटने त्याला खूप स्वातंत्र्य दिलंय आणि त्याला एक निर्भय क्रिकेटपटू बनवलं आहे. मी अनेक क्रिकेटपटूंना तुटून कोसळून जाताना पाहिलं आहे, विशेषतः गोलंदाजांना; पण विराटने त्याला सावरलं आहे.”२०२३ मध्ये, यश दयाल गुजरात टायटन्सकडून खेळत होता, या शेवटच्या षटकात रिंकू सिंगने त्याच्या गोलंदाजीवर ५ चेंडूत ५ षटकार मारले. यामुळे त्याची खूप थट्टा झाली आणि या संपूर्ण घटनेनंतर तो नैराश्यात गेला.

### दाखवलेला विश्वास सार्थ ठरवला

पण आयपीएल २०२४ च्या हंगामात, तो धोनीच्या संघाविरुद्ध १७ धावांचा बचाव करून हिरो बनला. गेल्या दोन वर्षांत त्याने क्रिकेटपटू म्हणून खूप चांगली प्रगती केली आहे. गेले दोन सीझन तो आयपीएलमध्ये आरसीबीकडून खेळत आहे आणि आरसीबीने त्याच्यावर दाखवलेला विश्वास त्याने सार्थ ठरवला.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। सोमवार ।
। दि. 5 मे 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती




ADMISSION OPEN
Moraya Shikshan Sanstha
"यत् भावो – तत् भवति"
Computer 15 days Crash Course
Our Courses
> PowerPoint with animation
> Basic Excel
> Corel Draw
> Adobe Photoshop
> Scratch Animation
> 'C' Language
> Basic Java
> Basic Tally
From
5th May 2025
1 Hour / day
Monday to Saturday
Contact
8087706100
Registration started
Venue: Computer Lab,
V. K. Mate Highschool


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal's
GAYATRI GROUP OF SCHOOLS, PUNE
ADMISSIONS OPEN
2025-26
PRE-PRIMARY TO
HIGHER-SECONDARY
From Learning
To Leading.
95277 64646 / 77967 67292
For more info

# पीएचडी मार्गदर्शकांकडून होताहेत गैरव्यवहार!

## आमदार शंकर जगताप: विधानसभेत राज्य सरकारचे लक्ष वेधले!

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पीएचडी मार्गदर्शक आणि सांगवी येथील बाबुराव घोलप महाविद्यालयातील अर्थशास्त्राच्या प्राध्यापिकेने पीएचडी विद्यार्थ्यांकडून लाच घेतल्याच्या प्रकरणावर विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात चर्चा झाली. आमदार शंकर जगताप यांनी या संदर्भात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांना प्रश्न विचारले. पीएचडी मार्गदर्शकांकडून होणारे गैरव्यवहार रोखण्यासाठी कठोर उयोययोजना करावी, अशी आग्रही मागणी आमदार जगताप यांनी केली.**



आमदार शंकर जगताप यांनी विचारलेल्या प्रश्नांमध्ये संबंधित प्राध्यापिकेच्या अटकेसह, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवरील नियंत्रण, विद्यार्थ्यांची गैरसोय, आणि पीएचडी मार्गदर्शकांकडून होणाऱ्या गैरप्रकारांवर सरकारने कोणती पावले उचलली आहेत, या महत्त्वाच्या मुद्द्यांचा समावेश होता.

या प्रश्नांना उत्तर देताना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी संबंधित प्राध्यापिकेच्या अटकेची घटना खरी असल्याचे मान्य केले. मात्र, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवर नियंत्रण नसल्याने विद्यार्थ्यांची छळवणूक होते, हा आरोप फेटाळला. तसेच, संशोधन केंद्रांमध्ये विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याचा मुद्दाही त्यांनी नाकारला. पुढील उपाययोजनांबाबत माहिती देताना मंत्रीमहोदय म्हणाले की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऑनलाईन पोर्टलवर ‘पीएचडी ट्रॅकिंग प्रणाली’ कार्यान्वित करण्यात आली असून, विद्यार्थ्यांना त्यांच्या अडचणींबाबत तक्रार नोंदविण्याची सुविधा देण्यात आली आहे. तसेच, विद्यापीठाकडून सर्व संशोधन केंद्रांचे शैक्षणिक व प्रशासकीय लेखापरीक्षण करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांना संशोधनासाठी आवश्यक सोयीसुविधा पुरवणे हे संशोधन केंद्रांना बंधनकारक करण्यात आले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणाच्या चौकशीसंदर्भात विद्यापीठाने आवश्यक ती माहिती संकलित केली असून, शासनस्तरावरही कार्यवाही करण्यात येत असल्याचे चंद्रकांतदादा पाटील यांनी सभागृहात सांगितले. या चर्चेदरम्यान, पीएचडी मार्गदर्शकांकडून होणाऱ्या गैरप्रकारांवर आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. तसेच, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवरील देखरेख अधिक सक्षम करण्याची गरज असल्याचे आमदारांनी अधोरेखित केले.

